नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २७० Issue - 270 | वार गुरुवार दि. १९ फेब्रुवारी २०२६ Blow- Thursday Date 19 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यसभेच्या ३७ जागांसाठी निवडणुकांच्या तारखा जाहीर

## १६ मार्च रोजी मतदान; १२ जागांवर एनडीए तर २५ जागांवर विरोधी पक्षांचा समावेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : निवडणूक आयोगाने बुधवारी १० राज्यांमधील ३७ राज्यसभेच्या जागांसाठी निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या. या ३७ जागांसाठी १६ मार्च रोजी निवडणुका होणार आहेत. रिक्त जागांपैकी १२ जागांवर एनडीए आहे, तर २५ जागांवर विरोधी पक्षांचा समावेश आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक (७) जागा आहेत, त्यानंतर तामिळनाडू (६) आणि पश्चिम बंगाल आणि बिहार (प्रत्येकी ५) आहेत. शरद पवार, रामदास आठवले, कनिमोझी, तिरुची शिवा आणि राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, प्रियांका चतुर्वेदी यांचा कार्यकाळ २ एप्रिल रोजी संपत आहे. १६ मार्च रोजी मतदान होईल आणि त्याच दिवशी संध्याकाळी पाच वाजता मतमोजणी होईल.



राज्यसभेच्या खासदारांची निवडणूक प्रक्रिया इतर निवडणुकांपेक्षा खूपच वेगळी आहे. राज्यसभेचे सदस्य अप्रत्यक्षपणे निवडले जातात, म्हणजेच ते जनतेने नव्हे तर आमदारांनी निवडले जातात. राज्यसभा हे कायमस्वरूपी सभागृह असल्याने आणि त्यातील एक तृतीयांश सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होतात, त्यामुळे दर दोन वर्षांनी निवडणुका होतात. राज्यसभेच्या एकूण जागांची संख्या २४५ आहे. त्यापैकी २३३ अप्रत्यक्षपणे निवडून येतात आणि १२ सदस्य राष्ट्रपती नियुक्त करतात. राज्यसभा निवडणूक जिंकण्यासाठी आवश्यक असलेल्या मतांची संख्या पूर्वनिर्धारित असते. एकूण आमदारांची संख्या आणि राज्यसभेच्या जागांच्या संख्येच्या आधारे मतांची संख्या मोजली जाते. एका आमदाराच्या मताचे मूल्य १०० आहे.

राज्यसभा निवडणुकीत, कोणत्याही उमेदवाराला जिंकण्यासाठी विशिष्ट संख्येच्या मतांची आवश्यकता असते, ज्याला विजयी कोटा म्हणतात. महाराष्ट्र विधानसभेत एकूण २८८ आमदार आहेत. सात जागा रिक्त होतील. एका आमदाराच्या मताचे मूल्य १०० असल्याने, महाराष्ट्रात राज्यसभेची एक जागा जिंकण्यासाठी किमान ३६ आमदार आवश्यक आहेत. मतपत्रिकेवर एका विशेष पेनने मतदान केले जाईल मतदान करताना निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेला फक्त एक मानक जांभळा रंगाचा स्केच पेन वापरला जाईल असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. इतर कोणत्याही पेनचा वापर वैध राहणार नाही. शांततापूर्ण आणि निष्पक्ष निवडणुका सुनिश्चित करण्यासाठी निरीक्षकांची नियुक्ती केली जाईल असे आयोगाने म्हटले आहे. निवडणूक आयोगाने आसाम, केरळ, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटबाबत जागरूकता मोहीम देखील सुरू केली आहे.

# सुनिल तटकरेंचा इशारा, अजित दादांचे एआय व्हिडिओ बनवणाऱ्यांना सुनावलं





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : काही स्वार्थी व्यक्ती राजकीय आणि सामाजिक हेतू साध्य करण्यासाठी अजित पवारांच्या आवाजात खोटी, दिशाभूल करणारी विधाने पसरवत आहेत. हे कृत्य अत्यंत गंभीर आणि दंडनीय गुन्हा असून संबंधित व्यक्तींनी अशा एआय उत्पन्न बनावट व्हिडिओ आणि ऑडिओ क्लिप्सचे वितरण त्वरित थांबवावे अन्यथा त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी दिला आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात अजित पवारांबद्दल आदर, प्रेम आणि विश्वासाची भावना आहे. त्या भावनेचा गैरफायदा घेऊन, लोकांमध्ये आणि पक्ष कार्यकर्त्यांमध्ये गोंधळ निर्माण करण्याचा हा घातक प्रयत्न आहे. मृत नेत्याची प्रतिमा अशा प्रकारे वापरणे हे अत्यंत नीच आणि निंदनीय कृत्य आहे. गुन्हेगारांना शिक्षा व्हावी यासाठी सायबर कायदे आणि इतर लागू कायद्यांनुसार खटले दाखल करण्यास पक्ष वचनबद्ध आहे असेही सुनिल तटकरे यांनी म्हटले आहे.

दरम्यान अशा कोणत्याही संशयास्पद ऑडिओ किंवा व्हिडिओ क्लिप फॉरवर्ड करू नयेत, असे आवाहन सुनिल तटकरे यांनी केले आहे.

दिवंगत अजितदादा पवार हे महाराष्ट्राचे लोकप्रिय नेते होते. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या नावाने खोटा प्रचार करणे हे सामाजिक हितासाठी हानिकारक आहे आणि लोकशाही मूल्यांवर आघात करणारे आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अशा सर्व कृत्यांचा तीव्र निषेध करतो आणि जबाबदार असलेल्यांनी या कृती तात्काळ थांबवाव्यात अशी मागणीही सुनिल तटकरे यांनी केली आहे.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाची विवेक भीमनवार यांना पद व गोपनीयतेची शपथ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : लोकभवन येथील कॉन्फरन्स सभागृहात राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाची विवेक लक्ष्मण भीमनवार यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रमुख उपस्थितीत होते. याप्रसंगी लोकसेवा आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष रजनीश शेठ, सचिव महेंद्र उत्तमराव हरपाळकर, सदस्य डॉ. अभय वाघ, सदस्य डॉ. दिलीप पाटील - भुजबळ, सदस्य राजीव निवतकर, सदस्य डॉ. सतीश देशपांडे, विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे आदी उपस्थित होते.

# फेडेक्स कार्गो हबमुळे महाराष्ट्रातील व्यापाराला नवी गती : मुख्यमंत्री

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे भूमिपूजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी मुंबई : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे फेडेक्सच्या समर्पित कार्गो हबचे भूमिपूजन हा भारत, मुंबई आणि महाराष्ट्रासाठी पुरवठा व्यवस्थापन खर्च क्षेत्रातील ऐतिहासिक टप्पा असून, या सुविधेमुळे राज्यातील उद्योग, निर्यात आणि व्यापाराला मोठी चालना मिळणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. बदलत्या जागतिक व्यापार परिस्थितीत फेडेक्सने मुंबईत गुंतवणूक करण्याचा घेतलेला निर्णय हा भारताच्या आर्थिक सामर्थ्याचा आणि महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांवरील जागतिक विश्वासाचे महत्त्वपूर्ण प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे फेडेक्सच्या समर्पित कार्गो हबचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास वनमंत्री गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक आणि उपाध्यक्ष विजय सिंघल, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अदानी एअरपोर्ट होल्डिंग लि. चे संचालक जीत अदानी, फेडेक्सचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी राज सुब्रमण्यम, फेडेक्स एमईआयएसच्या अध्यक्षा कामी विश्वनाथन, रिचर्ड स्मिथ, अरुण बंसल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, फेडेक्सची जागतिक स्तरावरील मजबूत उपस्थिती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे महाराष्ट्रातील कार्गो हाताळणी आणि व्यापाराला मोठी चालना मिळेल, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भविष्यात भारतातील सर्वोत्कृष्ट आणि सर्वाधिक व्यग्र प्रवासी व कार्गो विमानतळ ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

उद्योग, निर्यात आणि संपूर्ण व्यावसायिक परिसंस्थेला मोठा फायदा होईल

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) हा भारताच्या भविष्यातील आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू असून २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे योगदान देईल. पुरवठा व्यवस्थापन खर्च कमी करणे देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे असून फेडेक्ससारख्या कंपन्यांमुळे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हा खर्च




कमी होण्यास मदत होईल. महाराष्ट्र हा देशाच्या उत्पादन क्षेत्रात आघाडीवर असून फेडेक्सच्या सुविधेमुळे उद्योग, निर्यात आणि संपूर्ण व्यावसायिक परिसंस्थेला मोठा फायदा होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. प्रास्ताविक भाषणात अदानी एअरपोर्ट होल्डिंग लि.चे संचालक जीत अदानी म्हणाले की, फेडेक्सने नवी मुंबईची केंद्र म्हणून केलेली निवड ही महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांवरील जागतिक विश्वासाचे प्रतीक आहे. विमानतळाचे जवाहरलाल नेहरू बंदर जवळील धोरणात्मक ठिकाण आणि अत्याधुनिक कार्गो सुविधा यामुळे हे हब जागतिक स्तरावर स्पर्धात्मक ठरेल. या प्रकल्पामुळे निर्यातदार, लघु-मध्यम उद्योग, औषध व कृषी क्षेत्राला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी थेट जोडणी मिळेल. महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याबद्दल त्यांनी आभार मानले.

फेडेक्सचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी राज सुब्रमण्यम म्हणाले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे फेडेक्सच्या पूर्णपणे स्वयंचलित आणि अत्याधुनिक एअर कार्गो हबचे भूमीपूजन हा भारताच्या जागतिक व्यापार जोडणीतील महत्त्वाचा टप्पा आहे. फेडेक्सचा हा भारतातील पहिलाच हब असून, ३ लाख चौरस फूट क्षेत्रफळावर जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानासह उभारला जाणार आहे. फेडेक्सकडून या प्रकल्पात २५० दशलक्ष अमेरिकी डॉलरपेक्षा अधिक दीर्घकालीन गुंतवणूक करण्यात येत असून, भारताच्या वाढत्या आर्थिक क्षमतेवरील विश्वासाचे हे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले.

हा प्रकल्प भारताच्या राष्ट्रीय पुरवठा व्यवस्थापन खर्च धोरण आणि पीएम गतिशक्ती योजना उपक्रमाशी सुसंगत असून देशाची पुरवठा व्यवस्थापन खर्च क्षमता वाढविण्यास मदत करेल. फेडेक्सचे नेटवर्क सुमारे २२० देशांमध्ये कार्यरत असून, नवी मुंबई हबमुळे भारत जागतिक (पान २ वर...)

## व्हीएसआरवर बंदी आणि सखोल चौकशीची जय पवार यांची मागणी

# विमान अपघातात ब्लॅक बॉक्स सहजपणे नष्ट होऊ शकत नाहीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातामध्ये अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स डॅमेज झाल्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या. यासंदर्भात जय पवार यांनी इन्स्टाग्राम स्टोरी शेअर करत प्रतिक्रिया दिली आहे. जय पवार यांनी विमान अपघातात ब्लॅक बॉक्स सहजपणे नष्ट होऊ शकत नाहीत, असं म्हटलं आहे. याशिवाय व्हीएसआरला तात्काळ उड्डाणे चालवण्यास बंदी घालावी, अशी मागणी देखील जय पवार यांनी केली आहे.

विमान अपघातात ब्लॅक बॉक्स सहजपणे नष्ट होऊ शकत नाहीत; महाराष्ट्रातील जनतेला आपल्या हृदयाला हादरवून टाकणाऱ्या या दुर्घटनेचे संपूर्ण, पारदर्शक आणि निर्विवाद सत्य जाणून घेण्याचा हक्क आहे. व्हीएसआरला तात्काळ उड्डाणे चालविण्यास बंदी घालून, त्यांच्या विमानांच्या देखभालीत झालेल्या संभाव्य गंभीर गैरव्यवहाराबद्दल सखोल आणि निष्पक्ष चौकशी केलीच पाहिजे, असं जय पवार यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम स्टोरीच्या माध्यमातून म्हटलं आहे.



अजित पवारांच्या कुटुंबातील व्यक्तीकडून पहिल्यांदाच अजित पवार यांच्या अपघातावर जाहीर प्रतिक्रिया देण्यात आली आहे. जय पवार यांच्याकडून इन्स्टाग्राम पोस्ट करत पारदर्शक सत्य जाणून घेण्याची मागणी करण्यात आली आहे. व्हीएसआरला तत्काळ उड्डाणे चालविण्यास बंदी घालण्याची तसेच विमानांच्या देखभालीत झालेल्या संभाव्य गंभीर गैरव्यवहाराबद्दल सखोल चौकशीची मागणी जय पवार यांनी केली आहे. जय पवार यांनी देखील व्हीएसआरच्या चौकशीची मागणी करत रोहित पवार यांच्या प्रमाणं भूमिका घेतल्याचं पाहायला मिळतंय.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनं काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या भेटीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार देखील उपस्थित होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीबीआय मार्फत चौकशी करण्याची मागणी केली होती.

दरम्यान, रोहित पवार यांनी आतापर्यंत अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात तिसरी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी व्हीएसआरवर अनेक आरोप केल्याचं पाहायला मिळालं. अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात डीजीसीएनं दिलेल्या स्पष्टीकरणावर देखील रोहित पवार यांनी आक्षेप घेतला. याशिवाय व्हीएसआर विमान कंपनी आणि तेलुगु देसम पार्टीच्या नेत्यांचे संबंध असल्यानं केंद्रीय हवाई



वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांना पदावरुन हटवण्यात यावं, अशी देखील मागणी रोहित पवार यांनी केली होती. अजित पवार यांना जे विमान देण्यात आलेलं होतं, त्या विमानाचं इंजिन देखील बिघाड असलेले होतं, असा दावा देखील रोहित पवार यांनी केला होता.

## संपादकीय....

# राज्यसभेसाठी रस्सीखेच

मागील काही वर्षात भाजपमध्ये बाहेरून आलेल्यांना राज्यसभा किंवा विधान परिषदेवर पाठवले जाते. मात्र, आता तरी निष्ठावंतांचा विचार व्हायला पाहिजे, असे मत भाजपच्या एका गटाचे आहे. भारतीय संसदेच्या सर्वोच्च सभागृहांपैकी एक असलेल्या राज्यसभेच्या एप्रिल २०२६ मध्ये रिक्त होणाऱ्या जागांसाठी निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर करताच महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापले आहे. विशेषतः सत्ताधारी भारतीय जनता पक्षात इच्छुकांची भाऊगर्दी वाढल्याचे चित्र आहे. महाराष्ट्रातील ७ जागांसाठी होणारी निवडणूक ही केवळ संख्याबळाची लढाई नसून, पक्षांतर्गत निष्ठा विरुद्ध आयाराम या चर्चेचेही केंद्र बनली आहे. मागील काही वर्षांत बाहेरून पक्षात दाखल झालेल्या नेत्यांना राज्यसभा किंवा विधान परिषदेवर संधी दिली गेल्याची नाराजी भाजपमधील काही निष्ठावंत गटात आहे. यावेळी तरी निष्ठावंतांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी पक्षातील एका गटाकडून पुढे येत आहे. महाराष्ट्रातील ७ जागांसाठीची ही निवडणूक सत्तासमीकरणांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. विधानसभेचे एकूण संख्याबळ २८६ असून, दोन जागा रिक्त असल्याने प्रभावी संख्या २८४ आहे. एका उमेदवाराला विजयासाठी ३७ मतांचा कोटा आवश्यक आहे. महायुतीकडे एकूण २३५ आमदारांचे संख्याबळ असल्याने सहा जागा सहज जिंकण्याचे चित्र स्पष्ट आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, जागावाटप '४:१:१' या फॉर्म्युल्यानुसार होण्याची शक्यता आहे. यात भाजपला ४ जागा, शिवसेनेला १ जागा आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला १ जागा मिळणार असल्याचे समजते. तर महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे १० आमदार, काँग्रेसचे १६ आमदार आणि शिवसेना ठाकरे गटाचे २० आमदार असून एकत्रित ४६ मतांच्या बळावर एक जागा निश्चित मिळू शकते. मात्र, ती कोणाच्या वाट्याला जाणार यावरून अंतर्गत चर्चा रंगण्याची शक्यता आहे. भाजपमध्ये यावेळी उमेदवारीसाठी प्रचंड रस्सीखेच सुरू असल्याचे चित्र आहे. बाहेरून आलेल्या नेत्यांना संधी देण्याची परंपरा मोडून पक्षातील दीर्घकाळ काम केलेल्या निष्ठावंतांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे. आता भाजपचे केंद्रीय नेतृत्व कोणाला संधी देते आणि 'निष्ठावंत विरुद्ध आयाराम' या वादात कोणाचे पारडे जड ठरते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# फेडेक्स कार्गो हबमुळे महाराष्ट्रातील व्यापाराला नवी गती : मुख्यमंत्री

(पान १ वरून..) पुरवठा साखळीत अधिक प्रभावीपणे सहभागी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. फेडेक्सतर्फे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे ३ लाख चौरस फूट क्षेत्रफळाचे अत्याधुनिक, पूर्णपणे स्वयंचलित एअर कार्गो हब उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी फेडेक्सकडून सुमारे २ हजार ५०० कोटीं रुपयांची दीर्घकालीन गुंतवणूक करण्यात येणार असून, हा हब भारतासाठी प्रादेशिक पुरवठा व्यवस्थापन खर्चाचे केंद्र म्हणून विकसित होणार आहे. या सुविधेमुळे भारताचे दक्षिण-पूर्व आशिया, पश्चिम आशिया, युरोप आणि अमेरिका या प्रमुख जागतिक बाजारपेठांशी थेट व्यापार संपर्क अधिक मजबूत होणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील कार्गो क्षमता प्रारंभी सुमारे ०.५ दशलक्ष मेट्रिक टन वार्षिक राहणार असून, पुढील टप्प्यांत ती सुमारे ३.२५ दशलक्ष मेट्रिक टनांपर्यंत वाढविण्यात येणार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज : भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय इतिहासाच्या अभ्यासात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्थान केवळ एका पराक्रमी योद्ध्यापुरते मर्यादित ठेवणे ही एक मोठी बौद्धिक मर्यादा ठरेल. आधुनिक इतिहासलेखन, समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र यांच्या दृष्टीने पाहिले असता शिवाजी महाराज हे एक राज्यसंस्थापक, लोककल्याणकारी प्रशासक, धर्मनिरपेक्ष दृष्टी असलेले नेतृत्व आणि भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक म्हणून समोर येतात. म्हणूनच १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ स्मृतिदिन नसून भारतीय राज्यसंस्थेच्या ऐतिहासिक मुळांचा पुनर्विचार करण्याची संधी आहे.

सतराव्या शतकातील भारताची राजकीय परिस्थिती अत्यंत अस्थिर होती. मुघल साम्राज्याचे केंद्रीकरण, दखखनमधील आदिलशाही-कुतुबशाही यांचे संघर्ष, सरंजामी शोषण आणि धार्मिक-सामाजिक असुरक्षितता यांमुळे सामान्य जनता भयग्रस्त होती. अशा पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांचा उदय हा केवळ सत्तांतर नव्हता, तर राज्याच्या स्वरूपातच मूलभूत परिवर्तन घडवणारा होता. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही परकीय सत्तेविरोधातील प्रतिक्रिया नव्हे, तर स्वतःच्या लोकांसाठी स्वतःचे राज्य उभारण्याची सकारात्मक राजकीय दृष्टी होती.

इतिहासकार जदुनाथ सरकार, गोविंद सखाराम सरदेसाई, जेम्स लेन, स्टीवर्ट गॉर्डन यांसारख्या अभ्यासकांनी आपल्या लेखनात शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे विविध पैलू अधोरेखित केले आहेत. आधुनिक संशोधनानुसार, शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे लोकसंमतीवर आधारित, नैतिक अधिष्ठान असलेले आणि प्रशासकीय शिस्तीवर उभे असलेले राज्य होते. हे राज्य रयतेचे आहे हा विचार केवळ घोषणात्मक नव्हता, तर महसूल व्यवस्था, न्यायव्यवस्था आणि संरक्षण धोरणांतून प्रत्यक्षात उतरवला गेला होता.

शिवाजी महाराजांच्या घडणीत जिजाऊ मातेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. जिजाऊंच्या धार्मिक-नैतिक संस्कारांतून महाराजांमध्ये धर्मभावना निर्माण झाली, पण ती संकुचित नव्हती. रामायण-महाभारत, संत परंपरा आणि लोककथा यांमधून त्यांनी कर्तव्य, न्याय आणि लोकहित यांचे मूल्य आत्मसात केले. शहाजी राजांच्या अनुभवातून त्यांनी तत्कालीन राजकारणाची गुंतागुंत समजून घेतली. त्यामुळे शिवाजी महाराजांचे नेतृत्व भावनिक नसून विवेकाधिष्ठित होते.

स्वराज्याची उभारणी करताना शिवाजी महाराजांनी स्थानिक शक्तींना संघटित केले. मावळ प्रदेशातील शेतकरी, स्थानिक सरदार, कारागीर आणि सामान्य सैनिक हे स्वराज्याचे आधारस्तंभ होते. ही प्रक्रिया आधुनिक राज्यशास्त्रात सांगितल्या जाणाऱ्या सहभागी शासन संकल्पनेशी सुसंगत आहे. त्यामुळेच स्वराज्याला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळाला. लोकांनी ते आपले राज्य मानले, हीच त्याच्या यशाची गुरुकिल्ली ठरली.

लष्करी दृष्टिकोनातून पाहिले असता, शिवाजी महाराजांनी स्वीकारलेली गनिमी काव्याची रणनीती ही केवळ युद्धतंत्र नव्हती, तर ती संसाधन-मर्यादेतून निर्माण झालेली बुद्धिमान रणनिती होती. भूगोलाचा अचूक वापर, वेग, गोपनीयता आणि स्थानिक पाठिंबा यांच्या जोरावर त्यांनी बलाढ्य सैन्यांना पराभूत केले. मात्र महत्त्वाचे म्हणजे, युद्धातील नैतिकता त्यांनी कधीही सोडली नाही. स्त्रिया, मुले, वृद्ध आणि धर्मस्थळे यांना अभय देण्याची त्यांची भूमिका आधुनिक आंतरराष्ट्रीय मानवीय कायद्यांच्या तत्त्वांशी सुसंगत वाटते.

शिवाजी महाराजांचे प्रशासन हा त्यांच्या अभ्यासाचा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून त्यांनी कारभाराचे विकेंद्रीकरण केले. पंतप्रधान, अमात्य, सुमंत, सचिव, सेनापती, न्यायाधीश, पंडितराव यांसारखी पदे निर्माण करून त्यांनी कार्यविभागणी व उत्तरदायित्व निश्चित केले. महसूल व्यवस्था शेतकरीकेंद्रित होती. जमिनीचे मोजमाप, पीकपद्धतीनुसार कर आकारणी आणि आपत्तीच्या काळात सवलती देणे ही धोरणे लोककल्याणकारी राज्याची लक्षणे मानली जातात.

धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे स्थान विशेष आहे. त्यांच्या काळात धर्माधारित संघर्ष सामान्य होते, तरीही त्यांनी धार्मिक सहिष्णुतेची भूमिका घेतली. मशिदींचे संरक्षण, कुराणाचा सन्मान आणि मुस्लिम अधिकाऱ्यांना महत्त्वाची पदे देणे यावरून त्यांची भूमिका स्पष्ट होते. त्यामुळे शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे धर्माधिष्ठित नसून नैतिक अधिष्ठान असलेले राज्य होते, असे आधुनिक इतिहासलेखन मानते.

स्त्रीसन्मानाच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन त्यांच्या काळाच्या खूप पुढचा होता. इतिहासकारांच्या नोंदींनुसार, स्त्रीवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यात येत असे. युद्धात जिंकलेल्या स्त्रियांना सन्मानाने परत पाठवले जाई. ही भूमिका तत्कालीन सामंती मानसिकतेच्या पूर्ण विरोधात होती. त्यामुळे शिवाजी महाराजांना स्त्रीसन्मानाचे आद्य पुरस्कर्ते मानले जाते.



राज्याभिषेक हा शिवाजी महाराजांच्या जीवनातील एक निर्णायक टप्पा होता. तो केवळ धार्मिक विधी नव्हता, तर सार्वभौम भारतीय राज्याची औपचारिक घोषणा होती. परकीय सत्तांच्या छायेतून बाहेर पडून स्वराज्याला वैधता देणारा हा क्षण होता. राज्याभिषेकानंतर स्वराज्याची प्रशासकीय रचना अधिक सुसंगत आणि संस्थात्मक झाली.

शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे आकलन केवळ युद्ध आणि प्रशासनापुरते मर्यादित ठेवणे अपुरे ठरेल. त्यांच्या राज्यकारभाराचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे कूटनीती. सतराव्या शतकातील भारतीय राजकारण हे सतत बदलणाऱ्या सत्ता-समीकरणांनी व्यापलेले होते. मुघल, आदिलशाही, कुतुबशाही, स्थानिक सरदार आणि परकीय व्यापारी शक्ती यांच्यातील संबंध गुंतागुंतीचे होते. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांनी संघर्ष, तह, संधी आणि प्रतिकार यांचा समतोल साधत स्वराज्याचे हित जपले. आधुनिक आंतरराष्ट्रीय संबंध सिद्धांतात ज्याला 'रियलपोलिटिक' म्हटले जाते, त्याचे आद्य स्वरूप त्यांच्या धोरणांत आढळते. महाराजांनी शत्रूशीही गरज पडल्यास तह केले, परंतु स्वराज्याच्या स्वायत्ततेवर कधीही तडजोड केली नाही. आग्रा भेटीसारख्या प्रसंगात त्यांची राजकीय सूक्ष्मदृष्टी आणि मानसिक धैर्य स्पष्टपणे दिसून येते. इतिहासकारांच्या मते, आग्र्यातील कैदेतून सुटका ही केवळ धाडसी पलायन नव्हते, तर मुघल सत्तेच्या नैतिक व राजकीय मर्यादांचे भान देणारा प्रसंग होता. या घटनेनंतर शिवाजी महाराजांची प्रतिमा केवळ प्रादेशिक राजापेक्षा व्यापक बनली.

मराठा साम्राज्याचा विस्तार हा शिवाजी महाराजांच्या वैचारिक वारशाचा परिणाम होता. त्यांनी निर्माण केलेली प्रशासनिक चौकट, लष्करी शिस्त आणि लोकाभिमुख धोरणे यांमुळे पुढील पिढ्यांना साम्राज्य विस्ताराची दिशा मिळाली. छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि पुढे पेशवाई काळातील नेतृत्वाने शिवाजी महाराजांच्या संकल्पनांना पुढे नेले. तथापि, इतिहासकार हेही अधोरेखित करतात की शिवाजी महाराजांचे वैयक्तिक नेतृत्व आणि नैतिक अधिष्ठान हे अद्वितीय होते, ज्याची पुनरावृत्ती पुढील काळात तशीच्या तशी झाली नाही.

ब्रिटिश कालखंडात शिवाजी महाराजांची प्रतिमा नव्याने घडवली गेली. औपनिवेशिक इतिहासलेखनात सुरुवातीला त्यांना बंडखोर सरदार म्हणून दाखवण्याचा प्रयत्न झाला. मात्र भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांनी या दृष्टिकोनाला आव्हान दिले. लोकमान्य टिळकांनी शिवाजी जयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिक करून शिवाजी महाराजांना राष्ट्रीय प्रेरणास्थान बनवले. विनायक दामोदर सावरकर, महात्मा फुले, राजाराम मोहन रॉय यांसारख्या विचारवंतांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसंकल्पनेला आधुनिक स्वातंत्र्य चळवळीशी जोडले.

आधुनिक भारतीय राष्ट्रवादाच्या अभ्यासात शिवाजी महाराजांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरती मर्यादित नव्हती, तर ती सांस्कृतिक, सामाजिक आणि नैतिक स्वातंत्र्याशी जोडलेली होती. ब्रिटिश सत्तेविरोधातील लढ्यात स्वराज्य हा शब्द पुन्हा केंद्रस्थानी आला, याचे मूळ शिवाजी महाराजांच्या विचारांत आढळते. त्यामुळेच त्यांना भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक मानले जाते.

शिवाजी महाराजांचा धर्मविषयक दृष्टिकोन आधुनिक भारतासाठी विशेष संदर्भात्मक ठरतो. आजच्या बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक समाजात धार्मिक सहिष्णुता आणि परस्पर आदर ही मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून ही मूल्ये प्रत्यक्षात उतरवली. त्यांच्या काळातील राजकीय वास्तव पाहता ही भूमिका अधिकच महत्त्वाची ठरते. म्हणूनच आधुनिक राज्यशास्त्रात त्यांना 'सर्वसमावेशक शासक' म्हणून पाहिले जाते.

स्त्रीसन्मानाच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे विचार आजच्या लिंगसमतेच्या चर्चेतही मार्गदर्शक ठरतात. स्त्रीला केवळ संरक्षण नव्हे, तर सन्मान देण्याची त्यांची भूमिका सामाजिक परिवर्तनाची बीजे पेरणारी होती. आधुनिक स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते, शिवाजी महाराजांची भूमिका ही तत्कालीन पितृसत्ताक व्यवस्थेच्या चौकटीत राहूनही प्रगत होती.

प्रशासनशास्त्राच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचे राज्य हे कल्याणकारी राज्याच्या प्राथमिक संकल्पनेशी सुसंगत वाटते. महसूल सवलती, आपत्ती व्यवस्थापन, न्याय्य करप्रणाली आणि लोकाभिमुख न्यायव्यवस्था ही वैशिष्ट्ये आधुनिक कल्याणकारी राज्याच्या मूलतत्त्वांशी जुळणारी आहेत. त्यामुळे शिवाजी महाराजांचे राज्य हे केवळ ऐतिहासिक नव्हे, तर सैद्धांतिक अभ्यासासाठीही महत्त्वाचे ठरते.

आजच्या भारतात शिवाजी महाराजांचे स्मरण अनेकदा भावनिक किंवा राजकीय पातळीवर मर्यादित राहते. मात्र शैक्षणिक दृष्टीने पाहिले असता त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. अभ्यासक्रम, संशोधन आणि सार्वजनिक चर्चांमध्ये शिवाजी महाराजांना केवळ योद्धा म्हणून नव्हे, तर राज्यसंस्थापक, प्रशासक आणि सामाजिक सुधारक म्हणून मांडणे आवश्यक आहे. यामुळे इतिहासाचे अधिक समतोल आणि वैज्ञानिक आकलन विकसित होईल.

जागतिक इतिहासाच्या संदर्भात पाहिले असता, शिवाजी महाराजांची तुलना युरोपमधील राष्ट्रनिर्मात्यांशी करता येते. त्यांनी उभारलेले स्वराज्य हे स्थानिक परिस्थितीतून उगम पावलेले असले तरी त्यातील मूल्ये सार्वकालिक आहेत. स्वातंत्र्य, न्याय, लोककल्याण आणि नैतिक नेतृत्व ही मूल्ये कोणत्याही काळात आणि कोणत्याही समाजात उपयुक्त ठरतात.

समारोप करताना असे म्हणता येईल की छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ मराठा इतिहासाचे नव्हे, तर संपूर्ण भारतीय इतिहासाचे केंद्रीय व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही आधुनिक भारतीय राज्यव्यवस्थेची वैचारिक पूर्वपीठिका ठरते. १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ गौरवाचा उत्सव नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे. त्यांच्या विचारांकडे केवळ अभिमानाने नव्हे, तर अभ्यासपूर्ण दृष्टीने पाहिले तरच आपण त्यांच्या वारशाशी प्रामाणिक राहू शकतो. शिवाजी महाराजांचा वारसा म्हणजे तलवारीचा नव्हे, तर विचारांचा; सत्तेचा नव्हे, तर सेवेचा; विजयाचा नव्हे, तर मूल्यांचा वारसा आहे. आधुनिक भारताच्या लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनांत त्यांच्या स्वराज्याचा प्रतिध्वनी ऐकू येतो. म्हणूनच शिवाजी महाराज इतिहासात बंदिस्त न राहता आजही वर्तमानाशी संवाद साधतात आणि भविष्याला दिशा देतात.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),**
**ईमेल – bagate.rajendra5@gmail.com**

# ज्येष्ठ साहित्यिक माधव राजगुरू यांना पुन्हा एकदा साहित्यसेवेची संधी द्या!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या मान्यवर संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीत (२०२६-२०३१) परिवर्तन उत्कर्ष आघाडीच्या वतीने कार्यवाह पदासाठी उभे असलेले माधव राजगुरू हे मराठी भाषा, साहित्य आणि विशेषतः बाल-कुमार साहित्य क्षेत्रातील एक अभ्यासू, समर्पित व अनुभवी व्यक्तिमत्त्व आहे.

शैक्षणिक व व्यावसायिक योगदान

एम. ए., बी. एड. (मराठी) अशी शैक्षणिक पात्रता लाभलेले माधव राजगुरू हे पहिले मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर (अमरावती) येथील मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य राहिले आहेत. मराठी भाषा अभ्यासक, लेखक आणि संपादक म्हणून त्यांनी दीर्घकाळ कार्य केले आहे.

बालभारती मध्ये विशेषाधिकारी पदावरून निवृत्त होताना त्यांनी तब्बल २० वर्षे मराठी बालभारती पाठ्यपुस्तकांच्या निर्मिती व संपादनात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे असंख्य विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक साहित्य लाभले.

साहित्य क्षेत्रातील कार्य

मराठी बाल-कुमार साहित्य क्षेत्रात त्यांनी भरीव काम केले आहे. 'मराठी शुद्धलेखन', 'मराठी भाषा समज आणि ओळख', 'मुद्रितशोधन व मराठी शुद्धलेखन', 'इतिहास मराठी बालसाहित्याचा' यांसारख्या उपयुक्त पुस्तकांसह कुमारकथा, कविता आणि संपादित ग्रंथ असे एकूण २७ पुस्तके त्यांच्या लेखणीतून प्रकाशित झाली आहेत.

शुद्धलेखन, व्याकरण आणि मुद्रितशोधन यांसारख्या विषयांवर त्यांनी मार्गदर्शक स्वरूपाचे साहित्य निर्माण केले आहे, जे विद्यार्थी, शिक्षक आणि लेखकांसाठी दिशादर्शक ठरले आहे.

संस्थात्मक योगदान

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, अक्षरभारती, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था अशा विविध साहित्यिक संस्थांमध्ये त्यांनी सक्रिय भूमिका बजावली आहे. तसेच 'किशोर', 'जीवन शिक्षण', 'शिक्षण संक्रमण', 'निरंतर शिक्षण', 'मुलांचा हिरो झंप्या' यांसारख्या नियतकालिकांच्या संपादनाचा समृद्ध अनुभव त्यांच्या कार्यातून दिसून येतो.

सध्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थ्यांसाठी दहा खंडात्मक पुस्तक प्रकल्प राबविला जात आहे. तसेच मराठी भाषा विद्यापीठांतर्गत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी मराठी भाषा कौशल्य विकासात्मक पुस्तकाचे लेखन सुरू आहे.

परिवर्तन उत्कर्ष आघाडीला पाठिंबा द्या!

मराठी भाषा आणि साहित्याची समृद्ध परंपरा जपणारे, नव्या पिढीला सक्षम मार्गदर्शन करणारे आणि संस्थात्मक कामाचा मोठा अनुभव असलेले माधव राजगुरू यांना पुन्हा एकदा साहित्यसेवेची संधी देणे ही काळाची गरज आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र साहित्य परिषद अधिक सक्षम, कार्यक्षम आणि साहित्यप्रेमींच्या अपेक्षांना पूर्ण करणारी संस्था म्हणून पुढे जाईल, याबाबत शंका नाही.

म्हणूनच पंचवार्षिक निवडणूक सन २०२६-२०३१ साठी परिवर्तन उत्कर्ष आघाडीच्या सर्व सदस्यांना भरघोस मतांनी निवडून देऊन मराठी साहित्य सेवेच्या या कार्यात आपला मोलाचा सहभाग नोंदवा, ही नम्र विनंती.

मराठी भाषा – मराठी साहित्य – आपल्या संस्कृतीचा अभिमान!

**– धोडपा नंदे गावगाथा**

# श्रुतिक वरनाळे हिला 'स्टुडंट ऑफ द इयर' पुरस्काराने गौरव




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील वागदरी येथील कन्या कु. श्रुतिका दत्तात्रय वारनाळे हिला लातूर जिल्ह्यातील आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये 'स्टुडंट ऑफ द इयर' हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल तिच्या वर सर्व स्तरातून अभिनंदनाचे वर्षाव होत आहे.

सध्या बी. फार्मसीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या श्रुतिका वरनाळे मागील तीन वर्षे महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळवत सातत्यपूर्ण गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच संशोधन, कला, क्रीडा आदी विविध क्षेत्रांतही तिने उल्लेखनीय कामगिरी करून आपली सर्वांगीण प्रगती साध्य केली आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सवात तिने महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत कौशल्याची छाप पाडली आहे. तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या यशामागे प्रा. शिवशंकर वागदरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे सांगितले जात आहे. श्रुतिका वरनाळे हिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, नगरसेवक महेश हिंडोळे, ज्येष्ठ समाजसेवक दयानंद बिडवे, महाराष्ट्र प्रदेश भाजपा सदस्य शिवशरण जोजन, रवी कुमार वरनाळे, दत्तात्रय वारनाळे, ललिता वरनाळे यांच्यासह आदींनी कु.श्रुतिका वरनाळे हिच्या यशाबद्दल शुभेच्छा दिल्या या यशामुळे वागदरीसह अक्कलकोट तालुक्याचा शैक्षणिक गौरव वाढला असून सर्वत्र तिचे कौतुक होत आहे.

# खामसवाडी येथे शिवजयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी हनुमंत पाटुळे/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील छत्रपती संभाजी महाराज चौकामध्ये दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्राचे अराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंती निमित्त खामसवाडी गावामध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन जयंती समीतीच्या वतीने करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये एकुण ३५ रक्तदात्यांनी रक्तदान केले असुन सदरील रक्त संकलण धाराशिव येथील रेणुका ब्लड बँक यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी रेणूका ब्लड बँकेचे डॉ. मनोज इंगळे, हर्षदा कस्पटे, प्रज्ञा गंगावणे, ऐश्वर्या गंगावणे, अलशरा मुजावर व चैतन्य रानखांब उपस्थित होते.

**३५ रक्तदात्यांनी केले रक्तदान**

या शिबिराचे आयोजन सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिति खामसवाडी यांच्या वतीने करण्यात आले होते. या शिबिरासाठी समितीचे अध्यक्ष श्रीकांत बाकले, उपाध्यक्ष विशाल शेळके, सचिव बलराम कुलकर्णी, विकास शेळके, अतुल शेळके, शशिकांत पाटील, राहुल शेळके, रवी सावंत, अक्षय शेळके,गोपाळ शेळके या सर्वांनी परिश्रम घेतले. या प्रसंगी रक्तदात्यांना फळांचे वाटप करण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# शिवरायांनी महिला सबलीकरणाचा पाया रचला

## प्रा.विशाल गरड; शिवसेवा तालीम संघाला शिवभूषण पुरस्कार प्रदान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब. (प्रतिनिधी ) सुधाकर रणदिवे

छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या स्वराज्यात महिला सबलीकरणाचा पाया रचला. त्यांनी स्त्रियांना सन्मान देवून त्यांचे संरक्षण केले असे प्रतिपादन लोक व्याख्यानकार प्रा.विशाल गरड यांनी केले. ते कळंब येथील शिवसेवा तालीम संघाने आयोजित केलेल्या व्याख्यानमालेत शिवचरित्रातून महिला सबलीकरण या विषयावर बोलत होते. पुढे बोलताना प्रा.गरड म्हणाले की. शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्यासोबत माँसाहेब जिजाऊ, महाराणी येसूबाई, महाराणी ताराराणी यांचाही पराक्रम सांगणे काळाची गरज आहे. शिवरायांना चारित्र्य संपन्न राजा म्हणतात याचेश्रेय जिजाऊंना जाते. आजच्या आधुनिक मावळ्यांनी स्त्रियांचा सन्मान करून त्यांना समतेने वागवले पाहिजे.

या वेळ व्यासपीठावर , सभापती शिवाजी कापसे,नगर अध्यक्ष सौ.सुनंदा ताई शिवाजी कापसे, प्रतिष्ठित व्यापारी बंडोपंत दशरथ यांच्या सह शहरातील महिला, उद्योजक, व्यापारी उपस्थित होते.यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमांचे संचलन प्रा. गपाट यांनी तर आभार सुशील तीर्थकर यांनी मानले.

शिवभूषण पुरस्कार प्रदान

कळंब तालुका पत्रकार संघाच्या वतीने देण्यात येणारा शिवभूषण पुरस्कार, यंदा शिवसेवा तालीम संघ यांना जाहीर झाला होता.याच कार्यक्रमात हा पुरस्कार शिवाजी कापसे,सुशील तीर्थकर यांच्या सह तालीम संघाचे सर्व कार्यकर्त्यांना प्रदान करण्यात आला.या मध्ये सन्मानपत्र, ऊर्जस्तंभ पुस्तक,शाल,याचा समावेश होता.या वेळी कळंब तालुका पत्रकार संघाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे रक्तदान शिबिर संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट / प्रतिनिधी : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले या शिबिराचे उद्घाटन अक्कलकोट नगर परिषदेचे नूतन नगराध्यक्ष मा. श्री. मिलन दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या प्रतिमेस पूजन करून करण्यात आले . सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे आयएमसीचे चेअरमन मा. श्री.राजशेखर हिप्परगी साहेब होते आणि सदर शिबिरात संस्थेचे आयएमसी सदस्य मा. श्री.कमलाकर सोनकांबळे हे उपस्थित होते सदर रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान याचे महत्त्व सिव्हिल हॉस्पिटलचे डॉक्टर श्री. अजय इंगळे सर श्री. बनाळे सर यांनी पटवून दिले व प्रशिक्षणार्थ्यांना महत्त्व समजावून सांगितले. सदर शिबिरा करिता सूत्रसंचालन श्री मंठाळे सर यांनी केले सदर रक्तदान शिबिर करिता संस्थेचे प्राचार्य श्री प्रदीप हरिदास साहेब यांचे मार्गदर्शन लाभले सदर रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे जेष्ठ निदेशक श्री नदाफ सर,श्री.बोगाळे सर,श्री. बगले सर,श्री वाघमारे सर,सौ गवल मॅडम, श्री बिराजदार सर,श्री कोणापुरे सर, श्री स्वामी सर,श्री सोन्नद सर,श्री खंदारे सर, श्री.माडीकर या सर्वांचे सहकार्य लाभले.

# शिवजयंती निमित्ताने आयोजित शिव सप्ताहात रक्तदान शिबिर संपन्न : उत्स्फूर्तपणे रक्तदात्यांनी केले रक्तदान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील मौजे वागदरी येथे शिवजयंती निमित्ताने आयोजित शिव सप्ताहाच्या पाचव्या दिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिरात अत्यंत उत्स्फूर्तपणे रक्तदात्यांनी रक्तदान केले.

शिव -बसव-राणा व श्री संत काशीबा महाराज जन्मोत्सव मंडळ वागदरी तालुका तुळजापूरच्या वतीने वागदरी येथे दि.१३ फेब्रुवारी २२६ पासून शिव जयंती निमित्ताने शिव सप्ताहास प्रारंभ करण्यात आले असून या सप्ताहाच्या पाचव्या दिवशी दिनांक १७ फेब्रुवारी २२६ रोजी सकाळी दहा वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर, महाराणा प्रताप,व श्री संत काशिबा महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून या रक्तदान शिबिरास सुरुवात करण्यात आली.यावेळ पत्रकार किशोर धुमाळ, शिवजन्मोत्सव समितीचे सदस्य व किशोर धुमाळ यांचे चिरंजीव श्रीकार धुमाळ व युवा शेतकरी नागनाथ चव्हाण यांच्या पासून रक्तदानाला सुरुवात झाली. हळूहळू या रक्तदान शिबिरास प्रतिसाद वाढत गेला आणि एकूण ४ रक्तदात्यांनी या शिबिरामध्ये रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकीची दबाबदारी पार पाडली.

या शिबराये संपूर्ण कामकाज सिद्धेश्वर ब्लड बँक सोलापूरचे प्रमुख डॉ.योगेश कव्हेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.हरिशचंद्र गलियाल, धनश्री गुट्टे, वनिता गवणी, गेनसिद्ध चाबुकस्वार, सचिन कौंच आर्दीनी पाहिले. या वेळी या शिवसप्ताहाचे मुख्या प्रवर्तक अँड. अमोल पाटील सह जन्मोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते ग्रामस्थ उपस्थित होते.

# बार्टीच्या महिला तक्रार निवारण समितीकरिता अशासकीय सदस्य पदासाठी नियुक्ती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे कार्यालयात कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३' अंतर्गत महिला तक्रार समिती (ICC) गठित करण्याच्या अनुषंगाने अशासकीय सदस्यांची निवड करण्यात येणार आहे.

अशासकीय सदस्य NGO/ बाह्य सदस्य पदासाठी सामाजिक कार्य, महिला हक्क किंवा कायद्याचे ज्ञान असलेल्या पात्र महिलांकडून/ व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येणार आहे. तसेच त्याबाबत सविस्तर जाहिरात व विहित नमुन्यातील अर्ज बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावरती http:// barti.maharashtra.giv.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने इच्छुकांनी त्वरित अर्ज समक्ष कार्यालयामध्ये किंवा est.barti2014@gmail.com या ई-मेल आयडीद्वारे सादर करावा, असे आवाहन बार्टी संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे..

# सावरकर विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संचलित स्वा. सावरकर विद्यालय कोठुरे येथे सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात साजरे झाले , शालेय व्यवस्थापन समितीचे ज्येष्ठ सदस्य सुधाकर भाऊ मोगल, मोतीराम मोगल. विष्णू भाऊ मोगल, सुयोग गीते, पुंजाराम कडलग, प्रकाश कोरडे यासह विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते, ज्येष्ठ शिक्षक शिवाजी सानप तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले असून संस्थेचे कर्मवीर अण्णासाहेब मुरकुटे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. महोत्सवाची सुरुवात गणेशाची आराधनेने करण्यात आली. कार्यक्रमात विविध गीत, गवळण, पोवाडे ,अभंग व गाण्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे व परंपरेचे जतन करण्यात आले....

कार्यक्रमातून नजरेत राष्ट्र व हृदयात महाराष्ट्र , तसेच विविधतेत एकता व अखंडता हा संदेश यावेळी देण्यात आला. यामध्ये आई तुळजाभवानी ,राजे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यासाठी झुलवा पाळना,शेतकरी गीत , महाभारताचे काही प्रसंग, आदिवासी गीत, जुनी परंपरा असलेले कोणाचे गणगोत कोणाचे घर वासुदेवाने प्रस्तुत केलेले वास्तव, माझी शाळा, शंभूराजे यांचा छावा,भारुड विंचू चावला, रणछोड रंगीला राजस्थानी गीत,व इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेविषयी भावना गीतातून सादर करण्याचा प्रयत्न केला . विद्यार्थ्यांच्या प्रत्येक गाण्यासाठी उपस्थितांनी भरभरून बक्षिसे दिली तसेच या कार्यक्रमासाठी कोठुरे गावातील शिव तांडव साऊंड सिस्टिम चे संचालक कैलास पवार .याचे सहकार्य लाभले.. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षिरसागर, उपसभापती डी.बी मोगल ,तालुका संचालक शिवाजी गडाख , संचालिका शोभाताई बोरस्ते यांनी कार्यक्रमासास शुभेच्छा दिल्या... व कार्यक्रमाची प्रशंसा केली. सांस्कृतिक समितीचे प्रमुख निकम सुधाकर व त्यांचे सर्व सदस्य शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती चिखले यांनी केले.

# एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये 'शिवजन्मोत्सव' सोहळा उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त वाखरीतील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये शिवजन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. याप्रसंगी बोलताना शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांनी छत्रपतींच्या कार्याचा व विचारांचा आदर्श पुढे ठेवून आजच्या पिढीने आपल्या आचरणात उतरवणे हीच महाराजांना खरी मानवंदना ठरेल, असे विचार व्यक्त केले. स्वराज्य, शौर्य, निष्ठा आणि धर्मनिरपेक्षतेचा संदेश देणारे छत्रपतींचे जीवन प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांनी महाराजांच्या जीवनावर आधारित विविध कलागुण दर्शनाचे कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. 'हे हिंदू नरसिंहा प्रभो शिवाजी राजा' या नाटिकेतून छत्रपतींचे पराक्रम, दूरदृष्टी आणि जनतेप्रती असलेले प्रेम प्रभावीपणे उलगडण्यात आले. पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर नृत्याविष्काराने कार्यक्रमात रंगत आणली. यानंतर छत्रपतींच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या पराक्रमावर आधारित शिवपोवाडा, दमदार शिवगर्जना तसेच भाषणांमधून विद्यार्थ्यांनी आपल्या ओजस्वी वाणीने वातावरण भारावून टाकले. जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कला विभागाचे पुंडलिक अंकुशराव, संतोष देशपांडे, मराठी विभागाच्या रोहिणी गवळी, सुप्रिया अंकुशराव, संगीत विभागाचे विशाल विभुते, पूर्व प्राथमिक विभागाच्या स्वाती फडतरे व मनीषा सोनटक्के यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे नियोजन गणेश कदम यांनी पार पाडले. शिवचरित्रातून प्रेरणा घेत विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, शिस्त व नागरिकत्वाची भावना जागृत करणारा एमआयटी विश्वशांती गुरुकुलचा हा शिवजन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

**महाराष्ट्रासह देशातील अनेक संस्थांकडून गौरव**

# मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. शिवाजीराव मोरे यांना 'राजा शिवछत्रपती समाजभूषण' पुरस्कार जाहिर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : सामाजिक, आध्यात्मिक व पर्यावरण संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ह.भ.प. शिवाजीराव महाराज मोरे यांना त्यांच्या कार्याची दखल घेत प्रतिष्ठेचा 'राजा शिवछत्रपती समाजभूषण' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. राजा शिवछत्रपती सामाजिक संस्था, सातारा यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

मोरे महाराज यांनी 'निर्मल वारी' व 'हरित वारी' या अभियानांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, स्वच्छता जनजागृती, वृक्षारोपण तसेच समाजप्रबोधनाचे व्यापक कार्य उभारले आहे. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवून त्यांनी समाजात पर्यावरणाबाबत सकारात्मक जागृती निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याचा महाराष्ट्रासह देशातील अनेक संस्थांकडून गौरव करण्यात आला आहे.

पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील योगदानाबद्दल मोरे महाराज यांना विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यामध्ये सालूमर्दा थिमक्का नॅशनल ग्रीनरी अवॉर्ड २०१८-१९, पर्यावरण गौरव पुरस्कार २०१८, ऋषी पुरस्कार २०२२, वृक्षसेवा पुरस्कार २०२३, हिंदू शौर्य पुरस्कार २०२४ तसेच किर्लोस्कर वसुंधरा सन्मान २०२५ यांचा समावेश आहे. याशिवाय विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना सुमारे २५ ते ३० पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

मोरे महाराज हे संत तुकाराम महाराज यांचे विद्यमान अकरावे वंशज असून त्यांनी देहू येथील संस्थांन मध्ये नऊ वर्ष मुख्य विश्वस्त म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. सध्या ते श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांना विश्रांती मिळावी या उद्देशातून मंदिर समिती, सामाजिक वनीकरण विभाग सोलापूर, महाराष्ट्र शासन तसेच लोकसहभागातून श्रीक्षेत्र मंगळवेढा ते श्रीक्षेत्र पंढरपूर या २३ किलोमीटर पालखी महामार्गावर सन २०१८ मध्ये लोखंडी ट्रिगार्डसह ९२०० देशी वृक्ष (वड, पिंपळ, कडूलिंब, चिंच) लावण्यात आले. या वृक्षांचे संवर्धनही मंदिर समितीकडून सातत्याने करण्यात येत असून हा पथदर्शी प्रकल्प यशस्वी ठरला आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रदान करण्यात आलेला 'राजा शिवछत्रपती समाजभूषण' पुरस्कार हा त्यांच्या कार्याची महत्त्वपूर्ण दखल मानली जात आहे.

> **मोरे महाराज यांनी 'निर्मल वारी' व 'हरित वारी' यांसारख्या अभियानांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, समाजप्रबोधन व आध्यात्मिक कार्याचा प्रभावी संगम घडवून समाजासमोर नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याचा 'राजा शिवछत्रपती समाजभूषण' पुरस्काराने झालेला सन्मान ही अभिमानास्पद बाब आहे. त्यांचे अभिनंदन व शुभेच्छा!**
>
> **– गहिनीनाथ महाराज औसेकर (सह-अध्यक्ष, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर)**

# जनुना तांडा (रामनगर) येथे संत श्री सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी



दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

सिंदखेडराजा तालुक्यातील जनुना तांडा राम नगर येथे बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत श्री सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती १६ फेब्रुरवारी २०२६ रोजी अत्यंत भक्तिभाव उत्साह आणि समाजाच्या एक तेच्या वातावरणात यशस्वी रित्या साजरी झाली.

समाजातील बंधू भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने हा सोहळा अधिकच उत्साहपूर्ण आणि स्मरणीय ठरला. संत सेवालाल महाराज हे मानवतावादी, समाजसुधारक आणि बंजारा समाजाच थोर संत असून त्यांच्या शिकवणी आजही समाजाला दिशा देत आहेत. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून. विठ्ठल राठोड.ग्राहक उपभोक्ता संरक्षण समिती सिंदखेडराजा तालुका उकंडा सोमला पवार अंकुश भाऊ देशपांडे. अमोल भाऊ अवचार. प्रल्हाद चव्हाण. दिनकर चापला चव्हाण. लक्ष्मण पवार. श्रीराम राठोड. बन्सी काशिनाथ राठोड. काशिनाथ चव्हाण. नामदेव चव्हाण. प्रकाश चव्हाण. विजय चव्हाण. कृष्णा चव्हाण. भाऊराव पवार. नामदेव चव्हाण. सिताराम चव्हाण. गणेश पवार. अंकुश चव्हाण. गुलाब चव्हाण तसेच संपूर्ण जनुना तांडा वाशी महिला पुरुष व लहानथोर मंडळींनी संत सेवालाल महाराज यांच्या जयंती मध्ये सहभागी होत्या.

संत सेवालाल महाराज यांची पालखी तांड्यामधून मिरवणूक काढण्यात आली व नंतर सेवालाल बापूजी आरती घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# भूमि अभिलेख विभागाचे कामकाज पडले ठप्प

## भूमि अभिलेख कार्यालय सिंदखेडराजा आणि भूमि अभिलेख कार्यालय देऊळगाव राजा यांनी उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांना दिले निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

भूमी अभिलेख कर्मचारी कृती समिती महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनात आजपासून महाराष्ट्रातील सर्व भूमि अभिलेख विभागातील कर्मचारी संपावर गेले आहेत, त्यामुळे या संपाचा महाराष्ट्रातील भूमि अभिलेख विभागाशी संबंधित कामावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडल्याचे आज दिवसभरात दिसून आले.

भूमि अभिलेख च्या इतिहासात राज्यातील सर्व भूमि अभिलेख चे

### राज्यातील सर्व कर्मचारी गेले संपावर

कर्मचारी भूमी अभिलेख कर्मचारी कृती समिती महाराष्ट्र राज्य च्या एकाच छताखाली आले असून यातून कर्मचाऱ्यांची ताकद एकटवल्याचे दिसून येत आहे. भूमी अभिलेख विभागातील भूकरमापक हे विभागाचे कणा मानले जातात. जमिनीची मोजणी करण्यापासून ते शासकीय दस्तऐवज अद्ययावत ठेवण्यापर्यंत त्यांची कामे अत्यंत तांत्रिक आणि महत्त्वाची असतात.

भुकरमापक पदाची शैक्षणिक पात्रता ही अभियांत्रिकी पदवी किंवा पदविका करण्यात आली असून या विभागातील सर्व कामे हे तांत्रिक स्वरूपाचीच आ-हेत. इतर विभागातील खासकरून वन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील भुकरमापक पदांवरील कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतन देण्यात येत असून भुमिअभिलेख विभागांमध्ये मात्र कर्मचाऱ्यांना हे लिपिक वर्गीय वेतन देण्यात येत आहे. मा. न्याधिकरणाने (मॅट ) सुद्धा या कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल देऊन ही शासनाने अजूनही या कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतनश्रेणी लागू केली नाही, त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे.

कर्मचाऱ्यांनी आंदोलनाची रूपरेषा जाहीर केली असून ती पुढीलप्रमाणे,

१८ फेब्रुवारी २०२६ रोजी मोजणी साहित्य कार्यालयात जमा करून काळ्या फिती लावून काम काज करणार आहेत, २० फेब्रुवारी २०२६ पासून मोजणी काम बंद, २३ ते २६ फेब्रुवारीदरम्यान सामूहिक रजा , २७ फेब्रुवारी रोजी पुण्यात जमाबंदी आयुक्त कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे .

मागण्या मान्य न झाल्यास २ मार्चपासून संपूर्ण राज्यात बेमुदत संप पुकारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

आज निवेदन देताना भूमि अभिलेख कार्यालय सिंदखेडराजा आणि भूमि अभिलेख कार्यालय देऊळगाव राजा येथील कर्मचारी उपस्थित होते. भूमि अभिलेख कार्यालय सिंदखेडराजा चे मुख्यालय सहायक मारोती थोरवे, गोपाल वाघमारे, श्रीकांत बुलबुले,



सुनिता खडसे, प्रकाश शिंदे तसेच भूमि अभिलेख कार्यालय देऊळगाव राजा कार्यालयाचे भुमापक रमेश शिंदे, राजेंद्र गहेराव उपस्थित होते.

# पंढरपूर येथून प्रभाग पाच मधून नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल श्री ओंकार जोशी, आणि कुसुम पर्तंडे यांचा सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

: पंढरपूर नगरपालिकेच्या नुकत्याच निवडणुका झाल्या त्यामध्ये वार्ड क्रमांक पाच मधून श्री ओंकार जोशी, आणि कुसुम परचंडे, यांचा सत्कार सोहळा नुकताच, श्री संत श्रेष्ठ सद्गुरु कृष्णात महाराज मठ गोविंदपुरा पंढरपूर या ठिकाणी मोठ्या उत्साहात पार पडला. अँड संदीप कागदे मित्रपरिवार यांच्या वतीने कार्यक्रमाचे उत्तम आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाची सुरुवात मंगलमय वातावरणात स्व-ागत गीताने करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दोन्ही नूतन नगरसेवकांचा हर्षल व सद्गुरु कृष्णात महाराजांचा फोट गुलाबाची रोप देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी पत्रकार संरक्षण समितीच्या अध्यक्षपदी नागेश काळे यांचाही सत्कार करण्यात आला, सत्काराला उत्तर देताना नूतन नगरसेवक ओंकार जोशी यांनी कुसुम प्रचंड यांनी मतदारांचे आभार मानले. प्रभागातील मतदारांनी दिलेला विश्वास सार्थ ठरवून येणाऱ्या काळात उत्कृष्ट विकास कामे करून दाखवू असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन प्रीती वाघ यांनी केले. या कार्यक्रमाला श्रीराम कंपनी महेश कुलकर्णी ओंकार विरदे यांनी खंबीर साथ लाभली.

या सोहळ्याप्रसंगी गौरव कुलकर्णी, रेणुका कुलकर्णी माधवी डोळे, सुनील महाराज खिस्ते, वसुधा खिस्ते सुरेखा खिस्ते, किशोर खिस्ते यांनी आपली मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करत असताना मतदानही दिलेला विश्वासात ध्रुव आणि येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणात विकास कामे करू असेही आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे आभार अँड संदीप काकडे यांनी केले व कार्यक्रमाची सांगता साम ुदायिक पसायदानाने करण्यात आली. संदीप कागदे यांनी कार्यक्रमाचे मित्र परिवाराच्या वतीने उत्तम नियोजन केले होते.

# शेतकऱ्यांनी महाविस्तार ए आय ऍप डाउनलोड करावे : उप कृषि अधिकारी गणेश जगताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : दिनांक १७/२/२०२५ रोजी माननीय श्री श्रीधर चव्हाण तालुका कृषी अधिकारी पुरंदर, श्री अमोल सुतार मंडळ कृषी अधिकारी सासवड यांच्या मार्गदर्शनाखाली कातोबा हायस्कूल दिवे येथे विद्यालयातील विद्यार्थ्यांना महाविस्तार ए आय अँप बद्दल सविस्तर माहिती व एप्लीकेशन डाउनलोड करून रजिस्ट्रेशन व वापर याबद्दल




मार्गदर्शन केले.

यावेळी श्री.गणेश जगताप, उप कृषी अधिकारी सासवड यांनी या महाविस्तार प मधील बाबी कीड रोग सल्ला, पीक पद्धती, शेतीश-ाळा, एसओपी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.श्री. के.एन. जरांडे सहाय्यक कृषी अधिकारी दिवे मोबाईलवर महाविस्तार ॲप डाऊनलोड कसे करावे याबद्दल मार्गदर्शन केले.

श्रीमती शुभांगी रासकर सहाय्यक कृषी अधिकारी काळेवाडी यांनी महाविस्तार पचा वापर कसा करावा याबद्दल मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री साठे सर यांनी प्रास्ताविकात विद्यार्थ्यांना कृषी विभाग करीत असलेल्या मार्गदर्शनाबाबत आभार मानले. यावेळी प्रगतशील शेतकरी श्री. गणपत शीतकल, सर्जे राव अडाळगे व बहुसंख्येने विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या बुलढाणा जिल्हा उपाध्यक्षपदी सचिन खंडारे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : ग्रामीण पत्रकारांना व्यासपीठ निर्माण करून देण-ारी संघटना ग्राम ीण पत्रकारांच्या



अडीअडचणी व त्यांचे पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे संघटना म्हणून महाराष्ट्र राज्यात परिचित असलेली पत्रकारांची एकमेव संघटना म्हणजेच अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटना होय अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या बुलढाणा जिल्हा अध्यक्षपदी दैनिक भारत संग्राम चे जिल्हा प्रतिनिधी तथा दैनिक परतवाडा टाइमचे जिल्हा प्रतिनिधी व दैनिक महासागर चे सिनखेडराजा तालुका प्रतिनिधी सचिन खंडारे यांची निवड एकमताने करण्यात आली आहे 'दिनांक १५ फ ेब्रुवारी रोजी एसीएस हायस्कूलच्या सभागृहात झालेल्या जिल्हा कार्यकारणीच्या बैठकीमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर सुने व प्रदेशाध्यक्ष कैलास बापू देशम ुख यांच्या मार्गदर्शनाखाली सदर बुलढाणा जिल्हाध्यक्ष अश-ोक इंगळे यांनीही निवड केली आहे. '

सदर बैठकीला पश्चिम विदर्भ उपाध्यक्ष प्रताप मोरे तसेच पश्चिम विदर्भ संघटक प्रल्हाद देशमुख , पत्रकार समाधान सरकटे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख, जिल्हा सहसचिव पठाण , सिंदखेडराजा तालुका अध्यक्ष गणेश पंजरकर ' जिल्हा संघटक अशोक खरात ' राजू मोरे यावेळी उपस्थित होते.

# राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी इंदिरा गांधी महाविद्यालयाच्या साक्षी मोरेची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
घाटकोपर/केतन भोज : मुंबई विद्यापीठाच्या वतीने सोनूभाऊ बसवंत महाविद्यालय, शहापूर, ठाणे येथे नुकतेच मुंबई विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालय कुस्ती (महिला) स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या पार्कसाईट, विक्रोळी (पश्चिम) येथील इंदिरा गांधी महाविद्यालयाची विद्यार्थिनी साक्षी संजय मोरे (एफ.वाय.बी.ए.) हिने ५७ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले, तर अमृताकुमारी लक्ष्मण यादव (टी.वाय.बी.ए.) हिने ५० किलो वजनी गटात कांस्यपदक पटकावले.




मुंबई विद्यापीठाने सुवर्णपदक पटकावणारी साक्षी मोरे हिची दि. १७ ते २० मार्च २०२६ या कालावधीत कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र, हरियाणा येथे संपन्न होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुस्ती (महिला) स्पर्धा २०२५-२६ साठी निवड जाहीर केली आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कबड्डी, कुस्ती (पुरुष), ५ व १० किलोमीटर धा-वणे व क्रॉस कंट्री स्पर्धांसाठी निवड झाली आहे. महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणाऱ्या साक्षी मोरे हिचे सर्वत्र कौतुक होत आहे. संस्थेच्या अध्यक्ष पुष्पलता बाळासाहेब म्हात्रे , संस्थेचे विश्वस्त व महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र म्हात्रे , प्रभाग १२३ चे नगरसेवक सुनील मोरे यांनी तिचे व तिला मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक सतीश कदम यांचे अभिनंदन केले असून तिला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत

स्वेरीत 'विद्युत सुरक्षा जागरूकता आणि खबरदारीचे उपाय' हे सत्र संपन्न

कार्यकारी अभियंता राजेश वायदंडे

# विजेच्या काळजीपूर्वक वापराबाबत जनजागृती आवश्यक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : 'सध्याच्या धकाधकीच्या जीवनात विजेचा वापर जर हलगर्जीने केला तर आपण भरून न येणाऱ्या नुकसानीस सामोरे जावू शकतो यासाठी विजेचा वापर अत्यंत काळजीपूर्वक करावा. यासाठी सर्वोत्तम दर्जाची इलेक्ट्रिकल साधने, चांगल्या क्षमतेची अर्थिंग, वेळोवेळी इलेक्ट्रिकल साहित्यांची देखभाल या बाबी महत्त्वाच्या ठरतात. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये शिक्षण घेत असताना सर्वप्रथम विजेचा वापर काळजीपूर्वक पणे करण्यासाठी आपल्याबरोबरच समाजात देखील जनजागृती करणे आवश्यक आहे.' असे प्रतिपादन सांगली विभागातील महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेश वायदंडे यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) आणि कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) मधील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमधील विद्यार्थ्यांकरिता 'विद्युत सुरक्षा जागरूकता आणि खबरदारीचे उपाय' या विषयावर आयोजिलेल्या सत्रात अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेश वायदंडे हे विद्यार्थ्यांना विद्युत विभागाच्या संदर्भात जनजागृती, काळजी आणि सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाची माहिती देत होते. स्वेरीचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) चे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पदवी) च्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.चित्रसेन मैतई यांच्या नेतृत्वाखाली इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग या विभागात या सत्राचे आयोजन केले होते. प्रास्ताविकात प्रा. व्ही.ए. सावंत यांनी विद्यार्थ्यांना 'विद्युत सुरक्षा जागरूकता आणि खबरदारीचे उपाय' याची का आवश्यकता आहे हे सांगून कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट केला. पुढे बोलताना अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेश वायदंडे म्हणाले की, 'अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याबरोबरच आता वीज ही देखील आवश्यक घटक झाली आहे. विद्युत उपकरणे वापरताना काळजी घ्यावी कारण यात माफी, क्षमा नसते, त्याचा परिणाम जाणवतो. याचबरोबर घरामध्ये योग्य क्षमतेच्या आरसीबी, ईएलसीबी चा वापर करावा व अर्थिंग चांगल्या क्षमतेची करून घ्यावी आणि याची नियमित तपासणी करावी. कृषी अवजारे, बटन, प्लग, वायर असे इलेक्ट्रिकल साहीत्य आयएसआय प्रमाणित असावे.





वीज जोडणी करताना साहित्यात काटकसर, हल-गर्जीपणा न करता सुरक्षिततेच्या दृष्टीने काळजीपूर्वक जोडणी करावी. आपल्या घराचे बांधकाम विद्युत वाहिनी पासून सुरक्षित अंतरावर करावे, तारेच्या कुंपणाला विद्युत प्रवाह आणून सोडल्याने अपघात घडतात, तसेच विद्यूत वाहिनीच्या जवळ असणाऱ्या झाडाच्या फांद्या तोडणे, शेवग्याच्या शेंगा काढणे, उंच झाडावर असणारे आंबे, चिंच, नारळ काढणे या सर्व बाबी महावितरणच्या कार्यालयाला माहिती देऊन आणि कंपनीच्या अधिकृत कर्मचाऱ्यांकडून वीज बंद झाल्याची खात्री केल्यानंतरच सदरची कामे करावी. शेती पंपाची मोटर बंद पडल्यास स्वतः ती दुरुस्त न करता मान्यता प्राप्त ठेकेदाराकडून ते काम करावे. विद्युत वाहिनीवर आकडे टाकून वीज चोरी करणे हेही एक अपघाताचे कारण आहे. शेतातून विजेच्या तारा गेल्या असल्यास त्यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. घरामध्ये फ्लेक्झिबल वायरचा वापर केल्याने पत्र्याच्या शेडमध्ये करंट उतरतो व घरामध्ये असणाऱ्या मुव्हेबल मोटरचे कनेक्शन जोडत असताना मेल फिमेल कॉन्टॅक्ट चुकीच्या पद्धतीने जोडल्याने खूप मोठ्या प्रमाणात अपघात घडल्याचे निदर्शनास आले आहे. अडकलेले पतंग काढताना विद्यूत वाहिनीमुळे अपघात घडलेले आहेत. शेतामधील तार तुटून पडल्यास तुटलेल्या ताराम ध्ये विद्युत प्रवाह असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने त्या तारांना स्पर्श न करणे किंवा त्या तारा हा-ताने बाजूला करण्याचा प्रयत्न न करणे हे योग्य आहे. महावितरणच्या पोलला डव्हर्टायझिंग बोर्ड, होर्डिंग, बॅनर लावणे, महावितरणच्या पोल वरून टीव्हीचे केबलचे कनेक्शन नेणे, या गोष्टी टाळाव्यात. महावितरणच्या कोणत्याही इन्फ्रास्ट्रक्चरची कामे अधिकृत व्यक्तीकडूनच करावी. घराम ध्ये चांगल्या दर्जाच्या थ्री पिनचा वापर करावा. जोड असलेल्या फ्लेक्झिबल वायर वापरू नये. विद्युतभारीत वाहिनी पासून लोखंडी वस्तू नेत असताना उंचीचे भान ठेवावे. विद्युत वाहिनीच्या खाली ज्वलनशील पदार्थांची साठवणूक करू नये. विद्युत वाहिनीच्या खांबांना व ताणतारेला शेळ्या, मेंढ्या, गाय, म्हैस आदी जनावरे बांधणे टाळावेत.' असे सांगून अभियंता वायदंडे यांनी अपघात होण्याची कारणे व त्यापासून घ्यायची काळजी याबाबत सांगून राज्यातील वीज अपघाताची आकडेवारी सादर केली तसेच सण, उत्सव, शेतीपंप, घर, दुकाने, औद्योगिक वसाहत, कारखाने, शेतातील, विजेचे पोल, चुकीची वीजजोडणी अशा ठिकाणी घडणारे अपघात हे हलगर्जीने घडत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासाठी अभियंता वायदंडे यांनी आपल्या मार्गदर्शनातून उत्तम दर्जाचे वायरिंग, चांगल्या दर्जाची उपकरणे, वेळोवेळी तपासणी, वीज वापराच्या संदर्भात घ्यावयाची काळजी या संदर्भात घडलेल्या घटनांच्या छायाचित्रांचा वापर करून पटवून दिले. यावेळी घर-गुती वीज व त्याच्यापासून सुरक्षेसंबंधी विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न विचारले असता अभियंता राजेश वायदंडे यांनी त्यांच्या शंकांचे समाधान केले. तसेच वीजेपासून होणाऱ्या अपघातापासून सुरक्षा व घ्यायची काळजी यासंदर्भात पोस्टर्स वाटप केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सोलापूर शहर महावितरणचे डेप्युटी ऑपरेटर बी. एम. नारायणकर व स्वेरीचे प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्रा. डी.डी. डफळे, प्रा. एस.एम. घोडके, प्रा.वाय. आर. नागटीळक, प्रा. एस.एस. कवडे, प्रा.एस.एस. चौगुले यांच्यासह डिग्री व डिप्लोमा महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील प्राध्यापक वर्ग व जवळपास ५०० विद्यार्थी उप-स्थित होते.